**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

# प्रसिद्धी विभाग

# शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला – मा. अनंत राऊत

दि. ३१ जानेवारी २०२५

## समाजाची वेदना कवितेतून मांडतो : राऊत



**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** माझी कविता प्रामाणिक व शेती मातीशी नाते सांगणारी आहे. मी पुरस्कारासाठी कविता लिहीत नाही. समाजाची वेदना कवितेतून मांडल्यामुळे महाराष्ट्राने माझ्या कवितेवर प्रेम केल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध कवी अनंत राऊत यांनी केले. ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'माझ्या कविता तुमच्यासाठी' या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सर्जेराव पानसरे,प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर प्रबंधक के. आर. पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

अनंत राऊत म्हणाले, आत्मविश्वास हे यशाचे रहस्य असून ते तुमच्या जगण्यातून येत असते. शेती आणि मातीशी निगडित असलेली माणसे पुढे जातात. प्रत्येकाचा खरा हिरो त्याचे जन्मदाते आई–वडील असतात. त्यांचा सन्मान करा. आपला संघर्ष हा आपला असतो. त्याची जबाबदारी आपली असते. नशीब नावाच्या गोष्टीवर विश्वास ठेवू नका. प्रयत्न करीत राहा. छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास तलवार, ढाल, घोडा यांच्या पलीकडे जाऊन अभ्यासण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

माणसाचे श्रेष्ठत्व हे कर्तृत्वावर ठरते जन्मावर ठरत नाही. माणूस हा व्यसनाधीन, वासनाधीन नसावा तर तो वाचणारा असावा. तरुण वर्ग हा देशाचा तारणहार असून तो बदलला तरच इतिहास बदलेल इतकी ताकद त्यांच्यात असल्याचे त्यांनी सांगितले.या व्याख्यानात त्यांनी 'मित्र वनव्यामध्ये गारव्यासारखा..', रडतोस काय वेड्या, तुज्या गावावरून, तुला चोरून पाहीन मी, मायबाप या सुप्रसिद्ध कविता सादर करीत सर्वांची वाहवा मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती वाळुंज, परिचय उन्मेश जगताप, आभार दिव्या पिंगळे या विद्यार्थीनीने मानले.

दै. केसरी

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित व्याख्यानमालेत बोलताना कवी अनंत राऊत.

# समाजाची वेदना कवितेतून मांडतो

**■ प्रसिद्ध कवी अनंत राऊत यांचे प्रतिपादन**

**खेड : पुढारी वृत्तसेवा**

माझी कविता प्रामाणिक व शेतीशी नाते सांगणारी आहे. पुरस्कारासाठी कविता लिहीत नाही. समाजाची वेदना कवितेतून मांडल्यामुळे माझ्या कवितेवर रसिकांनी प्रेम केल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध कवी अनंत राऊत यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत "माझ्या कविता तुमच्यासाठी" या विषयावर ते बोलत होते. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, ॲड. सर्जेराव पानसरे, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही.बी.दौंडकर, प्रबंधक के. आर. पाचारणे, विद्यार्थी उपस्थित होते.

राऊत यांनी, आत्मविश्वास हे यशाचे रहस्य आहे. ते तुमच्या जगण्यातून येत असते. शेती आणि मातीशी निगडित असलेली माणसे पुढे जातात. प्रत्येकाचा खरा हिरो त्याचे जन्मदाते आई-वडील असतात. त्यांचा सन्मान करा. आपला संघर्ष हा आपला असतो. त्याची जबाबदारी आपली असते. नशीब नावाच्या गोष्टीवर विश्वास ठेवू नका. प्रयत्न करीत राहा.

माणसाचे श्रेष्ठत्व हे कर्तृत्वावर ठरते जन्मावर नाही. माणूस हा व्यसनाधीन, वासनाधीन नसावा. तो वाचणारा असावा. तरुणवर्ग हा देशाचा तारणहार असून, तो बदलला तरच इतिहास बदलेल इतकी ताकद त्यांच्यात असल्याचे त्यांनी सांगितले.

करिअर होईपर्यंत राजकारणी लोकांच्या नादी लागू नका. ज्या माणसाला त्याची परिस्थिती प्रेरणा देऊ शकत नाही त्याला कोणीच वाचवू शकत नसल्याचे त्यांनी सांगितले.

राजकारणात राहूनही निष्कलंक राहिलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे साहेबराव बुट्टेपाटील, असे गौरवोद्गार काढून त्यांचे समाजकारण विद्यार्थ्यांनी समजून घेण्याचे आवाहन केले.

सूत्रसंचालन प्रा. ज्योती वाळुंज यांनी केले. परिचय प्रा. उन्मेश जगताप, आभार दिव्या पिंगळे हिने मानले.

My Gramin Edition
Feb 06, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख